ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-III May - June 2021

# आधुनिक काळातील उद्योजकता शिक्षणाचे वाढते महत्व व बदलते दृष्टिकोन

**डॉ. मनिषा श्रीराम चौधरी**

*सहयोगी प्राध्यापक*

*ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक*

***सारांश***

***प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था ही त्या देशाचा कणा असते. अर्थव्यवस्था जेवढी मजबुत तेवढा तो देशही मजबूत असतो. अर्थात कोणत्याही देशाचा विकास हा आर्थिक विकासावर अवलंबून असतो. रशिया, अमेरिका, जपान, चीन व जर्मनी या देशांनी याचे महत्व ओळखल्यामुळे त्या देशात उदयोगधंद्यासाठी लागणारे व्यवसाय शिक्षण देण्यास फार पुर्वीपासून सुरुवात झाली आहे. या दृष्टीकोनातून जगातील सर्वच देशांनी उद्योजकता शिक्षणाकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. भारतातही शिक्षणाच्या विविध स्तरावर उद्योजकता शिक्षणाचा समावेश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच नवनविन उदयोजकतेसाठी पोषक शिक्षणाची विविध क्षेत्रे निर्माण केली जात आहेत. उद्योजकता शिक्षणाचे जाळे संपूर्ण देशभर जास्तीत-जास्त पसरविणे हे गरजेचे झाले आहे. भारतासारख्या विकासनशील देशाला आर्थिक महासत्ता बनायचे असेल तर उद्योजाकता व त्या माध्यमाने उत्पादन क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढविणे गरजेचे झाले आहे. उद्योजकता शिक्षणातून कुशल मनुष्य बळ जेवढे जास्त निर्माण होईल तेवढा जास्त उत्पादनावर सकारात्मक परिणाम होईल. यामुळे आर्थिक विकासास चालना मिळेल. उद्योजाकता शिक्षणात नव-नविन शाखा व दृष्टिकोन उदयास येत आहेत. त्या सर्वांचा विचार करून राष्ट्रीय विकासास जे उचित व पोषक असेल ते स्वीकारून त्या दृष्टीने अधिका अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. उद्योजकता शिक्षणात छोट्या व्यासायांपासून तर मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वच प्रकारचे शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याचे दीर्घकालीन फायदे आपणास पहावयास मिळतील.***

CC BY *Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/eiirj/*

**मुख्य संबोध :** उद्योजकता शिक्षण, व्यावसायिक कौशल्ये, प्रशिक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय विकास, मनुष्यबळ विकास, उद्यागाचे स्त्रोत, विपणन योजना, महिला सबलीकरण

- **प्रस्तावना**

वर्तमान काळात यशस्वी उद्योक होण्यासाठी आवश्यक असणारी विविध कौशल्ये शिकविणारी व त्या दृष्टीने प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था सर्वत्र उपलब्ध आहेत. विविध अभ्यासक्रम त्यासाठी राबविले जातात. असे असले तरी बरेच उद्योग हे अंगभूत कौशल्ये व अनुभवातूनच मोठे झालेले दिसून येतात. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर उद्योग, सतत, परिश्रम, चिकाटी यांना महत्वाचे स्थान आहे. त्यासाठी उद्योगाचा ध्यास घेतला पाहिजे. उद्योगीपणाचा संस्कार शाळांमधूनच होणेच आवश्यक आहे. यासाठी हस्तव्यवसायाचे शिक्षण, चांगल्या छंदाची रुजवणूक, विविध प्रकल्प देऊन विद्यार्थ्यांकडून ते काम पूर्ण करुन घेणे नियमित खेळाची सवय लावणे इ. सवयी लहानपणीच जडल्या पाहिजेत. देशाच्या अर्थव्यवस्थेत छोटे व मोठे असे दोन्ही उद्योग आपली भूमिका निभावत असतात. म्हणूनच तर भारत सरकारने मेक इन इंडिया, लघु उद्योगांसाठी स्वतंत्र आर्थिक धोरण, स्टार्ट अप धोरण, छोट्या उद्योगांना प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजना, व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी विविध उपक्रम राबवित आहे. अर्थातच राष्ट्रीय व सामाजिक दृष्टीकोनातून उद्योजकता

शिक्षणाचे वाढते महत्व लक्षात घेता देशातील तरुणांना व शालेय स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षण कार्यक्रम व उपक्रम राबवून व्यावसायिक दृष्टिकोन व उद्योगी वृत्ती विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे सतत प्रयत्न सुरु आहेत.

- **उद्योजकता शिक्षणाचा अर्थ**

श्री. हिगिंग (Higging) या विचारवंताने उद्योजकतेची सर्वसमावेशक व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. "उद्योजकता हे गुंतवणूक व उत्पादनाच्या संधीशी संबंधित कर्तव्य आहे. उत्पादनाची नवीन प्रक्रिया शोधून काढणे, भांडवलाची उभारणी करणे, कामगारांची जुळवाजुळव करणे, कच्चामाल गोळा करणे, व दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी व्यवस्थापकाची निवड करणे या बाबी उद्योजकतेशी निगडीत आहेत."

'एखादा उद्योयोग कोठे सुरु करावा, त्यासाठी पैसा कसा उभा करावा, कच्चा माल कोठून मिळवावा, कामगारांची जमवाजमव कशी करावी, नविन तंत्रज्ञानाचा कोठे कोठे वापर करावा, ते तंत्रज्ञान कसे विकसित करावे याचे दिले जाणारे शिक्षण म्हणजे उद्योजकता शिक्षण होय.'

उद्योजकता शिक्षणामध्ये फक्त कौशल्ये विकसित करणे अभिप्रेत नाही तर या शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेला पोषक वृत्ती, दृष्टिकोन व विचारसरणी विकसित करणे अपेक्षित आहे. कारण जो पर्यंत उद्योजकतेकडे विद्यार्थ्यांचा कल होत नाही तसेच अभिरुची निर्माण होत नाही तोपर्यंत हे शिक्षण यशस्वी होऊ शकत नाही. उद्योजकतेची मानसिक आणि व्यावहारिक तयारी शाळेपासूनच व्हायला हवी. उद्योजकता विकास हे शिक्षणपध्दतीचे मूलभूत मूल्य व्हायला हवे.

- **उद्योजकता शिक्षणाची आवश्यकता**

उद्योजकता शिक्षणाची आवश्यकता खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

1) उद्योजकता ही व्यक्तिगत बाब आहे. उद्योजकता ही व्यक्तीच्या मनोवृत्तीची वर्तणूकीत असते. शिक्षणातून ही मनोवृत्ती तयार व्हावी, पूरक वर्तणूक घडवून यावी यासाठी उद्योजकता शिक्षणाची आवश्यकता आहे.
2) उद्योजकता ही मानवी जीवनची प्रेरणा आहे. ती व्यक्तीच्या नसानसात असते, योग्य शिक्षणाततून ही प्रेरणा वाढीस लागावी, व्यक्तीच्या शरीराला, मनाला योग्य वळण लागावे व यातून व्यक्तीमत्वाला आकार प्राप्त हवा म्हणून उद्योजकता शिक्षणाची आवश्यकता आहे.
3) उद्योजकतेसाठी व्यक्तीची मानसिक व व्यावहारीक तयारी व्हायला हवी. उद्योगीपणाचा हा संस्कार शाळांमधूनच रुजविण्यासाठी उदयोजकता शिक्षण आवश्यक आहे.
4) तरुण उउद्योजक ही राष्ट्राची संपत्ती आहे. या शिक्षणातून विद्यार्थी आणि तरुण आर्थिक विकासाचा तुलनात्मक पर्याय विकसित करु शकतील यातून तरुणांचे व्यक्तीमत्व समृध्द होईल.
5) उद्योजकता शिक्षण नव्या पिढीला जीवनातील अनिश्चित आर्थिक विवंचनेला तोंड देण्यासाठी तयार करेल.
6) उद्योजकता शिक्षण व्यक्तीला नोकरीवर अवलंबून न ठेवता स्वयंपूर्णतेचा आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवेल.
7) उद्योजकता शिक्षणामुळे देशातील बेकारांची संख्या कमी होऊन राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल आणि यासाठी या शिक्षणाची आवश्यकता आहे.
8) उद्योजकता शिक्षण हे जीवनाबद्दलचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

अशा प्रकारे व्यक्तिगत विकासापासून तर राष्ट्रीय विकासापर्यंत उद्योजकता शिक्षण संबंधित आहे. यामुळे या शिक्षणाची आवश्यकता अत्यंत मोठया प्रमाणावर आहे हे आपल्या लक्षात येते.

- **उद्योजकता शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये रुजवावयाची गुणवैशिष्टये**

1) नवनिर्मीती क्षमता.

2) आत्मविश्वास.

3) जोखिम घेणे.

4) मानसिक तणाव सहन करण्याची क्षमता.

5) कठोर परिश्रम, बांधिलकी आणि टिकाऊपणा.

6) व्यवस्थापन कौशल्य.

- **उद्योजकता शिक्षणाची उद्दिष्टये -** उद्योजकता शिक्षणाची प्रमुख दोन उद्दिष्टये आहेत. ती खालील प्रमाणे आहेत.

**1) उद्योगासाठी व्यक्तीची मानसिक व व्यावहारिक तयारी करणे -**

उद्योजकता अंगी बाणण्यासाठी काही विशिष्ट गुणधर्म अंगी असणे आवश्यक असते. उदा. उदयोग सुरु करण्याची मनाची तयारी, स्वावलंबनब, चिकाटी, प्रयत्नशीलता, आत्मविश्वास, उत्साही वृत्ती, निर्णय क्षमता इ. या गोष्टी व्यक्तीत कमी अधिक प्रमाणात असतातच, परंतू याची जाणीव वाढ व निर्मीती शिक्षणातून करता येते. शिक्षणातून मनोबल, आत्मविश्वास व निर्णय क्षमता वाढविता येते. व्यावसायिक तयारीत अर्ज लिहीणे, बँकेचे व्यवहार, कर्जपूरवठा केंद्रे, बाजारपेठ, कच्चा माल पुरवठा केंद्रे, अनुरुप ठिकाण निवड यांचा समावेश होतो. म्हणून उद्योजकता शिक्षणाचे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**2) समाजाच्या प्रगतीस हातभार लावता येतो याची जाणीव निर्माण करणे** –

उद्योजकता शिक्षणातून समाजाच्या प्रगतीतील स्वता:चे मूल्य लक्षात आणून देता येते. देशाच्या आर्थिक विकासातील वाटा, देशातील बेकारी दूर करण्यासाठी मदत, ग्राहकांच्या गरजांची पूर्तता, इतरांसाठी रोजगाराच्या संधी याची जाणीव या शिक्षणातून करुन देता येते.

- **उद्योजकता शिक्षणाचे महत्व**

जागतिक बाजारपेठेत टिकायचे असेल तर अत्यंत कमी वेळात, माफक किंमतीत जागतिक दर्जाचे उत्पादन निर्माण करण्याचे आव्हान आपण स्विकारलेच पाहिजे. गरीबी हटविण्यासाठी रोजगार निर्मीती हवी, त्याचबरोबर उत्पादने व सेवा यांची विक्री झाली पाहिजे. पैसा खर्च करण्याची क्षमता असणाऱ्या नागरिकांची संख्या भारतात फार कमी आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी साधनांची, पैशांची विपुलता असल्याशिवाय उत्तम लोक तयार होत नाहीत. उत्तम लोक तयार झाल्याशिवाय साधने आणि पैसा निर्माण होत नाहीत. आपण ही विपुलता रोखली, परंतू चीन, दक्षिण कोरीया यासारख्या देशांनी हे ओळखले त्यामुळे 1959-60 पासून दक्षिण कोरीयाने आणि 1978 पासून चीनने आपले दरवाजे उघडून प्रचंड परकिय पैसा आणि तंत्रज्ञान मुक्त हस्ताने येऊ दिले. यामुळे या दोन्ही देशांनी जोरदार प्रगती केली.

भारतीय उद्योगांची 1991 ते 2000 मधील मानसिकता आणि आजची मानसिकता यात प्रचंड फरक आहे. त्याकाळात आपण उद्योग क्षेत्रात टिकू की नाही अशी भिती वाटत होती. पण आपण टिकू तर शकूच, परंतू आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आघाडी घ्यायचा प्रयत्न करु शकू, असा आत्मविश्वास भारतीय उद्योजकांना आहे. विना अडचणी संधी मिळाल्यास काय होऊ शकते. आणि तेही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत याची दोन उदाहरणे आहे. उदा. 1) लक्ष्मी निवास मित्तल हे तज्ञ नसतांनाही सबंध भारतात जितके पोलाद होते, त्याच्या दुपटीने ते उत्पादन करतात. 2) नारायण मूर्ती यांच्यामागे उद्योगाची पार्श्वभूमी नसतांनाही त्यांनी लक्षणीय यश मिळवले आहे.

जागतिक आढाव्यानुसार, कुठल्याही समाजात उद्योगशीलता असलेले लोक मोजकेच (2-3 टक्के) असतात. क्रियाशीलतेच्या जिवावर मोठया प्रमाणात संपत्ती निर्माण होत असते. परंतू आपल्याकडे मात्र अपवाद आहे. आपल्या देशात, कदाचीत समाजव्यवस्थेमूळे उद्योगशीलतेचे प्रमाण 10 ते 15 टक्के आहे.

उद्योजकांकडे आर्थिक ताकद निर्माण करण्याची मोठी क्षमता असते. मात्र त्यांना लागणारे शाळा, कॉलेजांमध्ये तयार होणारे मनुष्यबळ उत्कृष्ट असावे म्हणून प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी उद्योजक, अनुभवी व्यक्ती, संशोधक यांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग अशा विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी खूप उपयोगी ठरेल आणि पर्यायाने राष्ट्रीय समृध्दीची वाढ होण्यासाठी त्याचा फायदा होईल. कामाची संधी सर्व औद्योगिक देशांमध्ये तीन प्रकारे मिळते. 1) शेती उत्पादने 2) औद्योगिक उत्पादने 3) सेवा क्षेत्र.

प्रगत देशांमध्ये सर्व सामान्यांनंतर याचे प्रमाण अनुक्रमे 5 ते 10 टक्के, 20 ते 30 टक्के व 55 ते 65 टक्के असते. यामध्ये शेतीवर व माणसे कमी अवलंबून राहतात. शेतीची विभागणी होत नाही. त्यामुळे शेतकऱ्याना ती परवडते व सुधारणा करणे शक्य होत नाही. आणि त्याच्या जिवावर तो सगळया समाजाला खाऊ घालतो.

कोणत्याही समाजात अगदी अमेरिकेत सुध्दा दुर्बल व्यक्तीचे प्रमाण दहा ते वीस टक्केच आहे. आर्थिकदृष्टया अविकसित ते मध्ये आणि लोकसंख्येमध्ये सातत्याने भर पडत गेल्यास कोणतेही सरकार त्यावर आले तरी दुर्बल घटकांचा विकास हे आव्हान राहणारच आहे. यासाठी सर्जनशीलता, ज्ञान समन्वयाचे कौशल्य, उत्कर्ष चांगल्याकडून उत्कर्षतेकडे जाण्याचा ध्यास, नेतृत्वाचे गुण अंगी असलेल्या कुशाग्र बुध्दीमत्तेच्या प्रशिक्षित मनुष्यबळावर विश्वास ठेवणे आणि त्यांना अधिक संधी देणे हे अत्यंत महत्वाचे ठरेल.

अमेरिकेसारख्या अतिश्रीमंत देशात सर्वाधिक काम करणाऱ्या संस्थांना वर्षाला करोडो रुपयांच्या देणग्या मिळतातत. यातूनच त्यांचा आणि पर्यायाने दुर्बल समाजाचा विकास होतो. चांगल्या शिक्षणसंस्था वाढतात आपणही आपण आपला वेळ, विचार किंवा आर्थिक अशा स्वरुपात समाजाच्या विकासासाठी भाग घेऊ शकतो. समाज ज्ञानी करणे, उत्पादकता वाढेल असे प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे जितक्या वेगाने होईल, तितक्या वेगाने समृध्द भारताचे स्वप्न साकारता येईल.

- **उद्योजक बनण्यासाठी आवश्यक कौशल्य**

वर्तमान काळात यशस्वी उद्योक होण्यासाठी आवश्यक असणारी विविध कौशल्ये शिकविणारी व त्या दृष्टीने प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था सर्वत्र उपलब्ध आहेत. विविध अभ्यासक्रम त्यासाठी राबविले जातात. असे असले तरी बरेच उद्योग हे अंगभूत कौशल्ये व अनुभवातूनच मोठे झालेले दिसून येतात. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर उद्योग, सतत, परिश्रम, चिकाटी यांना महत्वाचे स्थान आहे. त्यासाठी उद्योगाचा ध्यास घेतला पाहिजे. उद्योगीपणाचा संस्कार शाळांमधूनच होणेच आवश्यक आहे. यासाठी हस्तव्यवसायाचे शिक्षण, चांगल्या छंदाची रुजवणूक, विविध प्रकल्प देऊन विद्यार्थ्यांकडून ते काम पूर्ण करुन घेणे नियमित खेळाची सवय लावणे इ. सवयी लहानपणीच जडल्या पाहिजेत. तरच त्यांच्यामध्ये उधोगीपणा हा सद्‌गुण येईल. एकवेळ रोग जडलेल्या माणसाला योग्य ते औषध देऊन बरे करता येते परंतू आळसावर उपायच नसतो. चलाख, हुशार व कार्यक्षम व्यक्तीपेक्षा आळशी माणसाची कार्यक्षमता कमी असते. उद्योगशील बनण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये ही खालीलप्रमाणे आहेत.

**1) स्वावलंबन -**

जो दुसऱ्यावरी विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला, असे व्यवहारात नेहमी आपण बोलतो व ऐकतो. कोणत्याही कामाची भिती न बाळगता स्वत: प्रयत्न करणे आवश्यक असते. स्वत: अर्ज लिहीणे, बँकेचे व्यवहार पाहणे, बिले भरणे इ. कामे स्वत: करण्याची वृत्ती असेल तर दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची वृत्ती कमी होते. उद्योग व्यवसायात आपण फारच जपून पावले टाकतो. धोके पत्करायला घाबरतो. शक्यतो हातचे राखून निर्णय घेतो आपण स्वत:हून पुढाकार घेत नाही. नेमून दिलेले काम करुन देण्यात आपण हुशार असतो. पण स्वत:पुढे येऊन नवा प्रस्ताव देणे किंवा नवा दृष्टीकोन मांडून, त्यानुसार कार्यवाहीची रुपरेखा सुचविणे याबाबत आपण फारच कमी पडतो ही मानसिकता आपण बदलली पाहिजे. जागतिक बाजारपेठेत शॉटकटला संधी नाही तेथे गुणवत्ताच महत्वाची ठरते.

**2) कल्पना शक्ती** –

उद्योजकाची कल्पना शक्ती म्हणजे बाजारात कोणती नविन उत्पादने किंवा कोणत्या नव्या सेवा उपलब्ध करुन ध्यायच्या याचा शोध घेणारी शक्ती होय. भविष्यकाळातत कोणती उत्पादने जास्त खपतील किंवा कोणत्या सेवांना जास्त मागणी असेल हे उद्योजकाला समजणे आवश्यक आहे. उत्तम उद्योजक यासाठी आधीपासूनच जागरूक असतो आणि म्हणून तो यशस्वी ही होतो. प्रत्येक आर्थिक उत्पन्न गटातील लोकांना परवडेल अशी वस्तू हे गणित आपल्याला का जमू नये? कमीत कमी किमतीच्या घडळयांचे उत्पादन करणे आपल्याला का जमत नाही? ग्राहकांची गरजा पाहून वस्तूची निर्मीती करण्याची कल्पनाशक्ती विकसित करायला हवी. नाविन्याला जागतिक बाजारपेठेत खूप महत्व आहे. नाविन्यपूर्ण कल्पना सर्वोत्तम अमलात आणणे जास्त महत्वाचे आहे.

**3) आत्मविश्वास** –

हाती घेतलेले कार्य तडीस नेण्यासाठी आत्मविश्वास हवा. ठरविलेले ध्येय गाठण्यासाठी न थांबता प्रयत्न करायला हवेत. इतरांच्या टीकेला दाद देण्याचे काम अध्र्यावर सोडल्यामुळे काम अध्र्यावर अपयश पदरी पडू शकते. यासाठी बऱ्याचवेळा काही कूटुंबातून नकारात्मक सूर ऐकू येतात. यामुळे मुलांमध्ये नकारात्मक भावना निर्माण होऊन आत्मविश्वास कमी होतो. मुलांवर विश्वास ठेवून जबाबदारी टाकली की, मुलांचा आत्मविश्वास वाढीस लागतो. अशावेळी मुलांचा आत्मवविश्वास वाढण्यासाठी त्यांना शाबासकी देऊन प्रोत्साहन ध्येयायला हवे. उद्योग व्यवसायातील धोके पत्कारण्यासाठी आत्मविश्वास असावा लागतो. उदा. इन्फोसिसच्या आजवरच्या वाटचालीचा मूलमंत्र हाच आहे, कि सामुहिक ध्येयपूर्तीच्या दिशेने आत्मविश्वासाने प्रत्येक पाऊल टाकता येणे हेच आहे. कोणत्याही परिस्थितीत कच न खाता निर्णयाची अंमलबजावणी करणे यासाठी आत्मविश्वास असावा लागातो. अवघड गुंतागुंतीचा निर्णय लांबणीवर टाकण्याची मानसिकता सोडून देऊन महत्वपूर्ण निर्णय घेण्याची धडाडी विकसित करणे ही वृत्ती विकसित व्हायला हवी.

**4) उत्साही वृत्ती** –

विद्यार्थ्यांमध्ये उपक्रमशिलता निर्माण केल्यानंतर त्यांच्यात त्या त्या उपक्रमांमध्ये उत्साह निर्माण केल्यामुळे त्यांचा हुरुप वाढून विविध उपक्रम पूर्ण होण्यास मदत होते. कोणतेही काम करतांना कर्तव्यभावनेने केल्यास त्यात रुची निर्माण होते. उत्साही मानवाला अशक्य असे काहीच नाही. कोणत्याही गोष्टीची प्राप्ती करण्यास उत्साहासारखे दुसरे श्रेष्ठ बल नाही. जीवनात यश प्राप्त करण्यासाठी उत्साही वृत्ती आवश्यक असते.

**5) व्यवस्थापन कौशल्य** –

आपल्या वस्तूच्या उत्पादन प्रक्रियेत खीळ पडणार नाही, याची उद्योजकाला काळजी घ्यावी लागते. उत्पादनासाठी आवश्यक असणारा कच्चा माल, प्रशिक्षित मनुष्यबळ यांचा सतत पुरवठा होत राहील, याबाबत दक्ष राहावे लागते. म्हणून उत्पादन प्रक्रियेतती प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाही व्यवस्थित चालू ठेवण्यासाठी आवश्यक असे चातूर्य उद्योजकाकडे असावे लागते. ज्या व्यक्ती ग्राहकांच्या गरजा हेरुन त्या पूर्ण करणारे उपक्रम सुरु करतात. आणि त्यातून नफा मिळवितात. त्यांना उद्योजक म्हणतात. उदा. जे. आर. डी. टाटा, बिर्ला, धीरुभाई अंबानी इ. समाजाचा विकास करता करता स्वत:चा विकास करावा ही भूमिका उद्योजकाला मनात बाळगावी लागते.

- **उद्योजकतेसाठी आवश्यक साधन सामुग्री**

**1) नैसर्गिक साधने -**

उद्योगासाठी आवश्यक असलेल्या पाणी, शेतमाल खनिज इ. सारख्या नैसर्गिक वस्तू किंवा साधने अशा नैसर्गिक संसाधनांच्या बाबतीत आपला देश संपन्न आहे. पण ही नैसर्गिक साधने विषम स्वरुपात आढळतात. तसेच पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे उपलब्ध नैसर्गिक साधने पुर्णांशाने वापरता येत नाहीत. साठवणूक वाहतूक यांसारख्या

पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने शेतकरी जास्त पिके घेण्यास तयार नसतात. शिवाय या परिस्थितीचा शेतमालाच्या दर्जावरही परिणाम होतो.

**2) मनुष्यबळ** –

उद्योगासाठी आवश्यक असणारी माणसे म्हणजेच मनुष्यबळ होय. या माणसांची क्षमता, त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण, त्यांची हुशारी, त्यांच्याकडे असलेले उद्योजकीय कौशल्यावर मनुष्यबळाचा दर्जा ठरत असतो. भारतीय लोकसंख्येच्या विविध समस्या आहेत. तंत्रकौशल्याचा अभाव, अज्ञान, अंधश्रध्दा यामुळे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा परिचय नसल्यामुळे ही माणसे नवनविन उत्पादन प्रक्रियेत सामील होऊ शकत नाहीत. अपेक्षित दर्जाचे उत्पादन करण्यास ती सक्षम नसतात. त्यामुळे त्यांना नोकरी मिळणे कठीण जाते. शिक्षणाचा अभाव, अज्ञान, दारिद्रय यामुळे त्यांना स्वत:चा उद्योग व्यवसायही उभारता येत नाही. यामुळे आपल्याकडे मोठया प्रमाणात बेकारी आढळते.

**3) भांडवल** –

उत्पादनासाठी लागणारी जमीन, मोठमोठी यंत्रसामग्री, अवजारे इ. चा भांडवलात समावेश होतो. अवजारांच्या निर्मीतीत व वापरातही सुक्ष्मता व काटेको ेरपणा याकडे कमी कल आढळून येतो. साहजिकच दर्जेदार अवजारे मिळणे अवघड होते.

- **उद्योगाचे मूळ स्त्रोत** - उद्योग व्यवसायाचे मुख्य दोन स्त्रोत आहेत. 1) छंदातून व्यवसाय 2) लोकांच्या गरजामधून व्यवसाय.

**1) छंदातून व्यवसाय** -

अनेकांना वेगवेगळे छंद असतात. अशा छंदातून आपल्याला विरंगुळा मिळतो, आनंद मिळतो, आपल्या अशाच एखादया छंदाचा बारकाईने विचार केला आणि नियोजन केले तर छंदातून ही एखादा व्यवसाय सुरु करता येतो अशा व्यवसायातून आपल्याला आनंद मिळतो आणि उत्पन्नही मिळते.

**2) लोकांच्या गरजांमधून व्यवसाय** –

लोकांच्या गरजा हेरुन व्यवसाय उभारता येतो. उदा. राहणीमानाच्या बदलत्या संकल्पनेमुळे गृहिणीनां सर्व कामे उरकतांना अडचणी येतात. विविध फळे, भाज्या निवडून घरपोच करण्यासाठी किती तरी सेवा करता येण्यासारख्या आहेत.

- **विपणन योजना (Marketing Plan)**

आपल्याला एखादा उद्योग किंवा व्यवसाय करायचा असेल तर आपल्याजवळ आपली विपणन योजना तयार असणे आवश्यक आहे. विपणन योजना नसेल तर कोणताही उद्योजक कधीही यशस्वी होऊ शकणार नाही.

**1) विक्री आराखडा** - विक्री आराखडयात पुढील बाबींचा समावेश होतो.

अ) जाहिरात - आपल्या उत्पादनाची ग्राहकास माहिती देणे आणि ग्राहकानी ते खरेदी करावे म्हणून त्याचे मन वळवणे म्हणजेच जाहिरात होय.

ब) वितरण - आपले उत्पादन विक्रेत्याकडे पाठवण्याची व ते साठवून ठेवण्याची जी व्यवस्था केलेली असते, ती व्यवस्था म्हणजे वितरण होय.

क) विक्री - विशिष्ट किंमत घेऊन ग्राहकाला आपले उत्पादन किंवा सेवा देणे म्हणेजच विक्री होय.

**2) विपणन आराखडा** - यामध्ये चार घटक आहेत. 1) उत्पादन - (Product) 2) किंमत - (Price) 3) कोठे विकणार - (Place) 4) कसे कळवणार - (Promotion)

- **उद्योजकता शिक्षणामध्ये संगणकाचे महत्व**

व्यक्तीमत्व विकास या विषयांतर्गत उद्योजकता शिक्षणातून विद्यार्थ्यांना वर्तमान व भविष्यकालीन उद्योजक विश्वाची माहिती देऊन आजच्या जागतिकी करणाच्या युगात आत्मनिर्भर बनविणे आवश्यक आहे. संगणक हा माहिती संप्रेषणाच्या युगातील अविभाज्य घटक बनला आहे. संगणकाची गरज सर्व सामान्यांच्या जीवनाची आवश्यक गरज बनू पाहत आहे. संगणक हा उद्योग निर्मीतीचा महामार्ग होऊन स्वावलंबी जीवनाची ऊर्जा बनेल यासाठी मूलभूत प्रयत्न शिक्षणस्तरापासूनच करावे लागणार आहेत. शिक्षक म्हणून या संगणक उद्योजक विश्वाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहाचवण्याची जबाबदारी उद्योजकता शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकावर आली आहे.

संगणकाच्या एकुण कार्यपध्दती वरुन यामध्ये प्रामुख्याने 1) हार्डवेअर 2) सॉप्टवेअर 3) नेटवर्कींग आणि 4) ज्ञानाधिष्ठीत भागाच्या कार्यपध्दतीवर संगणकाचे उद्योगविश्व विस्तारत आहे. सध्याच्या जागतिकी करणाच्या युगात संगणकाच्या मदतीने माहितीची देवाण-घेवाण झपाटयाने होत आहे. त्यासाठी आपली माहिती किंवा उद्योगांसंदर्भात असणारी माहिती आकर्षक पध्दतीने सारद करण्यासाठी वेबसाईट अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. ऑनलाइन बिझनेस स्वरुप वेगाने विस्तारत आहे. मॉल, शॉपी, मोठी हॉटेल्स यांचे व्यवहार ऑनलाईन होत आहेत. शेअर्समधील चढउतार इ. बाबतचे व्यवहार अधिका-अधिक सोप्या पध्दतीने करावयाचे असतील तर त्याबाबतची माहिती हवीच. नेटवर्कींगच्या मदतीने कमी वेळ, श्रम, मनुष्यबळ तसेच रुपयांमध्ये आपण आपल्या उद्योगाची अधिकाधिक समृध्दी करु शकतो. मानवी जीवनात प्रत्येक पैलूसंदर्भात काही क्षणातच माहितीचे दालन खुले करण्याची उदारता संगणकामध्ये आहे. ई-लर्निंगच्या माध्यमातून स्वत: शिकत शिकत इतरांनाही शिकविता येते. आपले ज्ञान सतत अद्ययावत करावयाचे असेल तर संगणक साक्षरता होणे काळाची गरज आहे.

वरील स्वरुपाची अनेकविध बदलत्या उद्योगविश्वाची माहिती शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच देणे अत्यंत महत्वाचे ठरणार आहे. आजच्या बदलत्या युगामध्ये संगणक शिकणे किंवा साक्षर होणे, म्हणजे त्या माध्यमातून आत्मनिर्भर व उद्योगाभिमूख जीवन जगण्याची कला आनंदाने आत्मसात करणे होय. अशा स्वरुपाचा दृष्टिकोन निर्माण झाला तरच व्यक्तीमत्व विकासाची सार्थकता काही प्रमाणात झाली असे म्हणावे लागेल.

- **उद्योजकता शिक्षणातून महिला सबलीकरण**

महिलांचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांना आर्थिक अधिकार देण्यावाचून गत्यंतर नाही उद्योजगताच्या विकासातूनही त्यांचा दर्जा उंचावू शकतो. जागतिक बँकेने सबलीकरणाची व्याख्या व्यक्ती किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ठ त्या कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया अशी केली आहे. या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असणाऱ्या वौयक्तिक आणि सामाजिक कृती संपत्ती निर्माण करतात आणि या संपत्तीच्या वापरावर नियंत्रण ठेवणाऱ्या संघटनात्मक आणि संघात्मक कार्यक्षमता आणि प्रामाणिकता यात सुधारणा घडवून आणतात.

सबलीकरणाला अनेक बाजू आहेत. एखाद्याच्या जीवनाला आकार देण्यासाठी सर्व क्षेत्रांत निवडीचे आणि कृतीचे स्वातंत्र्य प्रदान करणे त्यात अभिप्रेत आहे. साधनसंपत्ती आणि निर्णय यावरील नियंत्रणही त्यात अभिप्रेत आहे. लैंगिक असमानतेमुळे घरात तसेच समाजात स्वातंत्र्यावर काही प्रमाणात का असेना, मर्याद येतात. म्हणून महिला सबलीकरणसाठी वौयक्तीक पातळीवर (उदा. आरोग्य, शिक्षण आणि अधिकार) आणि सामुहिक स्तरावर संपत्ती आणि क्षमता यांचा ठेवा आवश्यक आहे. महिलांचे सामाजिक सबलीकरण ही एक दीर्घ कालीन आणि अवघड प्रक्रिया आहे. महिलांच्या एकुण लोकसंख्येच्या 58.4% महिला 15-59 वर्षे या आर्थिकदृष्टया सक्रीय वयोगटातील महिलांकडे लक्ष देणे जरुर आहे. कारण स्त्री आर्थिकदृष्टया सक्षम झाली म्हणजे तिला सामाजिक दृष्टया सक्षम करणे सुलभ होईल. या माहिलांनी शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, उत्पन्नवाढ आणि विकास प्रक्रिया, निर्णय घेणे इ. मध्ये सक्रिय सहभाग घेण्याची गरज आहे.

भारतामध्ये महिला उद्योजकांना या संधी मिळाल्यामुळे गरजेपोटी का असेना उद्योजक झाल्या आहेत.महिलांमध्ये हस्तकला, हातमाग वस्तू बनविण्याचे, लोणची बनविण्यासारख्या अन्न प्रक्रियांचे कौशल्य असते. त्याचा वापर करुन छोटे उद्योग निर्मीती करुन किफायतशीरपणे करता येईल. लोकसंख्यावाढ आणि रोजगार बाजारातील तीव्र स्पर्धा यामुळे आधिकाधिक महिला उद्योजकतेकडे जाण्याची शक्यता आहे. उद्योजकतेच्या विकासामुळे एखादी स्त्री केवळ स्वत:साठीच संपत्ती निर्माण करणार नाही, तर परिसरातील इतर स्त्रियांसाठी रोजगार निर्माण करील. याचा अनेक पट परिणाम संपत्ती निर्माण करण्याच्या प्रक्रियेवर होईल. आणि दारिद्रय निर्मूलनास त्याची मदत होइल.

- **संदर्भ सूची**

1. डॉ. ह. ना. जगताप, शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
2. डॉ. दिलीप पाटील, डॉ. दिनेश भक्कड, उद्योजकता आणि प्रकल्प व्यवस्थापन, अथर्व पब्लिकेशन, जळगाव
3. डॉ. अरुण येवले, डॉ. सुखदाने, डॉ. चौधरी, उद्योजकता विकास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
4. डॉ. किशोर वंगळ, उद्योजकता आणि विकास, साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर
5. डॉ. आसावरी दुर्गे, आकाश बेले, विपणन व्यवस्थापन, साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर
6. डॉ. विनोद पाटील, आधुनिक शिक्षणातील आव्हाने, ऑरेंजबुक्स पब्लिकेशन्स, भिलाई
7. www.maharashtratimes.com/लेख/डॉ. अभिनव चतुर्वेदी/भरारी उद्योजकता शिक्षणाची/09-05-2019
8. www.prahaar.in/शिक्षण आणि उद्योजकता यांची सांगड घालावी/30/06/2013
9. www.naviarthkranti.org/article-series/business-wisdom/effective-ways-teach-your-kids-about-enterprenership-navi-arthkranti.